महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक - रवींद्र घोडविंदे

news.thanejeevandeep@gmail.com

Rs.2/-

रविवार ❖१९ जानेवारी २०२५ ❖वर्ष ६ ❖अंक २०५ ❖ पाने - ४ RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024

# पंतप्रधान मोदींच्या हस्ते गावठाण सनद वाटप

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ ठाणे(प्रतिनिधी)




खेड्यापाड्यातील लाखो नागरिकांच्या जमिनींचे वादविवाद आजही सुरु असून त्यांना त्यांच्या जमिनीविषयी पक्की माहिती नसते. स्वतःच्या घराची कागदपत्रे त्यांच्याकडे नसतात,जमिनीच्या सीमा माहिती नसतात. त्यामुळे कळत नकळत त्यावर कब्जा केला जातो. कोर्टकचेऱ्यांमध्ये हेलपाटे मारताना पिढ्यान् पिढ्या खर्ची पडतात.

वकिलांची फी, कोर्टाचे खेटे यात अनेक कुटुंबे अक्षरशः रडकुंडीला येतात. कितीतरी दावे आजही कोर्टात पडून आहेत. अशा परिस्थितीत लोकांचा वेळ, श्रम आणि पैशाचा अपव्यय होतो. देशातल्या अशा करोडो लोकांना चिंतामुक्त करण्यासाठीच मोदीजींनी 'स्वामित्व' योजना आणली. ही फक्त एक सरकारी योजना नाही तर ग्रामविकासाची चळवळ आहे. या चळवळीत आपण सगळ्यांनीच सहभागी व्हायचे आहे, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले.

'स्वामित्व' योजनेंतर्गत गावठाण भूमापन सनद वितरण कार्यक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृष्यप्रणालीद्वारे संपन्न झाला. यानुषंगाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते व स्थानिक लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि स्वामित्व योजनेच्या लाभार्थ्यांच्या उपस्थितीत ठाणे जिल्ह्यातील गावठाण भूमापन सनद वितरण कार्यक्रम येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे आज संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी खासदार नरेश म्हस्के, आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, अप्पर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख बाबासाहेब रेडेकर, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, उपजिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, विकास गजरे, मल्लिकार्जून माने, उप मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद काळे, भूमी अभिलेख कार्यालयाचे इतर अधिकारी-कर्मचारी आणि स्वामित्व योजनेचे लाभार्थी उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दि.२४ एप्रिल २०२० रोजी स्वामित्व योजनेचे उद्घाटन केले होते. या योजनेचा उद्देश गावातील आबादी क्षेत्रातील घरांसाठी सनद व मालमत्ता पत्रक देणे, हा आहे. यासाठी ड्रोन तंत्रज्ञान आणि प्रगत नकाशांकन तंत्राचा उपयोग केला जातो. ही योजना ग्रामीण समुदायांच्या आर्थिक समावेशनात सुधारणा, पतपुरवठ्यास सुलभता आणि एकूणच सामाजिक-आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी महत्वाची भूमिका बजावते.

स्वामित्व योजनेचे लाभ सर्वात महत्वाच्या व शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील अधिनस्त असलेले तालुका ठाणे, कल्याण, शहापूर, भिवंडी, अंबरनाथ मधील एकूण ४३ गावात स्वामित्व योजनेंतर्गत सनद वाटपाचे कार्यक्रम संबधित गावांमध्येही आयोजित करण्यात आले होते.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, गरिबांच्या कल्याणाचा ध्यास घेतलेले देशाचे लोकप्रिय आणि यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या स्वामित्व योजनेच्या या सोहळयाला आपण सर्वजण उपस्थित आहोत. जिल्ह्यातील लाभार्थ्यांना प्रॉपर्टी कार्डचे वितरणही करण्यात आले आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांच्या आयुष्यात सुखाचे आणि चिंतामुक्त दिवस आले आहेत.

ते म्हणाले, भारताचा आत्मा गावात आहे, असे आपण नेहमी म्हणतो. परंतू, दुर्देवाने ग्रामीण भाग काहीसा दुर्लक्षित राहतो. परंतु, २०१४ नंतर परिस्थिती बदलली आहे. ग्रामीण भागाची 'आर्थिक प्रगती' करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या १० वर्षात असंख्य लोकाभिमुख योजना आणल्या. २०२० मध्ये सुरू केलेली 'स्वामित्व योजना' ही त्यापैकीच एक अत्यंत यशस्वी योजना आहे. ही योजना म्हणजे ग्रामस्वराज्याचं मूर्तीमंत उदाहरण आहे. ग्रामीण भागातील गरिबांना आत्मनिर्भर करणारी मोहीम आहे. हे केवळ मालमत्तेचे कार्ड नाही तर त्यांचे 'स्वाभिमान कार्ड' आहे. 'माझी संपत्ती माझा अधिकार' असे सांगणारे हे कार्ड आहे.

श्री.शिंदे म्हणाले की,देशातल्या पायाभूत सुविधांचा विकास करतानाच कल्याणकारी योजनांची मालिका गेल्या १० वर्षांत आपल्याला पहायला मिळत आहे. देशातल्या ८० कोटी गरिबांना मोफत अन्नधान्य पंतप्रधान श्री.मोदी यांच्यामुळे मिळत आहे. उज्वला योजनेतून मोदीजींनी अनेक बहिणींच्या डोळ्यातील अश्रू पुसले, पंतप्रधान आवास योजनेतून लाखो गरिबांना घरे मिळवून दिली. किसान सन्मान निधीतून बळीराजाची ताकद वाढविली. ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करणासाठी 'सहकार से समृध्दी' चा मंत्र दिला. आज देशातल्या ५० हजार गावांतील ५८ लाख लोकांना स्वामित्व प्रॉपर्टी कार्डचे पंतप्रधानांच्या हस्ते ऑनलाईन वितरण झालंय. आपल्या राज्यातील ३६ हजार १९५ गावांना याचा फायदा होणार आहे. आत्तापर्यंत १५ हजार ३२७ गावांचे प्रॉपर्टी कार्डस् तयार आहेत. तसेच २३ हजार १३२ गावांचे अंतिम नकाशेही तयार झाले आहेत. यात गावांचे ड्रोनने सर्वेक्षण केले जाते तसेच जीआयएस तंत्रज्ञानाद्वारे ग्रामीण भागातील जमिनीचे सीमांकन होते. आत्तापर्यंत देशातल्या सव्वातीन लाख गावांमधून ड्रोन सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे २.१९ कोटी प्रॉपर्टी कार्डस् तयार करण्यात आले आहेत. यापूर्वी अनेक राज्यांमध्ये गावांच्या रहिवासी क्षेत्राचे नकाशे नव्हते. त्यामुळे बँकांकडून कर्ज मिळत नव्हते. या नव्या योजनेमुळे अनेक मालमत्ताधारकांना त्यांच्या प्रॉपर्टी कार्डच्या माध्यमातून बँकेचे कर्ज घेता येणार आहे, असे सांगून उपमुख्यमंत्री पुढे म्हणाले की, आपल्या भिवंडीच्या बळीराम माणेकर यांना या योजनेतून जागेचा मालकी हक्क प्राप्त झाला. त्यामुळे त्यांना व्यवसायासाठी बँकेने ६० लाख कर्ज मंजूर केले. त्यातून ते आत्मनिर्भर झाले आहे. प्रॉपर्टी नावावर असल्याने बँकेतून कर्ज घेणे सोपे होतंय. दुसऱ्या तिसऱ्याकडून जास्त व्याजाने पैसे घेण्याची आफत येत नाही. त्यामुळे कर्जबाजारीच्या दुष्टचक्रातून अनेक जण बाहेर पडले आहेत, याचा मला विश्वास आहे.

**'स्वामित्व' योजना ही ग्रामविकासाची चळवळ - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

या योजनेमुळे गरिबांना कुणापुढे हात पसरायला लागणार नाही. आत्मनिर्भर भारताचं जे स्वप्नं आहे ते अशाच योजनांच्या माध्यमातूनच साध्य होणार आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागात आमूलाग्र बदल होत आहेत. गावठाणातील सीमा निश्चित होवू लागल्या आहेत. प्रत्येकाचे प्रॉपर्टी कार्ड तयार होतंय. सरकारचा महसूल वाढतोय. गावातील मालकी हक्काचे आणि हद्दीचे वाद कमी होत आहेत. ग्रामपंचायतीला ग्राम विकासाचे नियोजन करण्यामध्ये या प्रॉपर्टी कार्डचा उपयोग होतोय, त्यातून विकास योजना मार्गी लागत आहेत.

ते म्हणाले की, या मोहिमेत ग्राम परिवर्तन घडविण्याचे सामर्थ्य आहे. हे सामर्थ्य आपल्याला वाढवायचे आहे. गावांचे अन् इथल्या बळीराजाचेही सामर्थ्य वाढवायचे आहे.

देशाला बलशाली करायचे आहे. देशातील अशा रेकॉर्ड नसलेल्या मालमत्तांची किमत तब्बल १ लाख ३७ हजार कोटींपेक्षा जास्त आहे. बाजारभाव यात विचारात घेतला आहे. प्रत्यक्षात त्याची किंमत यापेक्षा कितीतरी पटीने जास्त असू शकते. त्यामुळे एवढ्या किंमतीच्या मालमत्तांचे अधिकार आपण मूळ मालकांना प्रदान करीत आहोत. ही क्रांतिकारी योजना आहे. येणाऱ्या कित्येक पिढ्यांचे त्यातून कल्याण होणार आहे.

# राज्याच्या विकासात राजपत्रित अधिकारी महासंघाची साथ...

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ठाणे(प्रतिनिधी)

राज्य शासनाच्या विविध विभागांतील सुमारे १ लाख ५० हजार गट 'अ' व गट 'ब' राजपत्रित अधिकाऱ्यांचे समान प्रश्न शासन-प्रशासनाशी चर्चाविनिमयाद्वारे सोडविण्यासाठी दि.७ फेब्रुवारी १९८६ रोजी 'महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ' हे व्यासपीठ स्थापन करण्यात आले. सद्यःस्थितीत सर्वच खात्यांतील अधिकाऱ्यांच्या ७० खाते संघटना महासंघाशी संलग्न आहेत. वर्ष १९९० मध्ये महासंघास 'शासनमान्यता' मिळालेली असून, १९९५ पासून महासंघासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त विचारविनिमय समितीची स्थापनाही झालेली आहे. या समितीच्या नियमित बैठकाही होत असतात.

'कार्यसंस्कृती' अभियानाचे पुढचे पाऊल म्हणून, राज्याच्या विकासासाठी व भ्रष्टाचारमुक्त शासन-प्रशासनासाठी अधिकारी महासंघाने विचारपूर्वक 'पगारात भागवा' हे अभियान जोमाने सुरु ठेवले आहे. महाराष्ट्राच्या प्रशासकीय सबलतेसाठी महासंघाच्या वतीने 'माझे कार्यालय -माझी जबाबदारी' हे नवीन कार्यसंस्कृती अभियान कर्तव्य भावनेने सुरु केले आहे.

महासंघाच्या या अभियानास गरजू व सामान्य जनतेमधून सकारात्मक व प्रोत्साहनपर प्रतिसाद मिळत असून, हे 'जनताभिमुख' कार्य अधिक जोमाने सुरु राहणार आहे.

महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाच्या ३९ व्या वर्धापन दिनानिमित्ताने पूर्वनियोजन व इतर विषयांबाबतची बैठक शुक्रवार, दि.१७ जानेवारी २०२५ रोजी महासंघाचे संस्थापक व मुख्य सल्लागार श्री.ग.दि. कुलथे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहात संपन्न झाली.

या बैठकीकरिता महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे अध्यक्ष विनोद देसाई, सरचिटणीस समीर भाटकर, महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाच्या ठाणे जिल्हा समन्वय समितीचे नवनियुक्त अध्यक्ष तथा निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, कोकण विभागाचे सहसचिव डॉ.अविनाश भागवत, सरचिटणीस तथा जिल्हा माहिती अधिकारी श्री.मनोज शिवाजी सानप, मुख्य सल्लागार श्री.मोहन पवार, राज्य कार्यकारिणीचे श्री.रमेश जंजाळ, श्री.सुदाम टाव्हरे, श्री.दिगंबर सिरामे, श्री.बापूसाहेब सोनवणे, श्री.सिदप्पा बोरकडे, डॉ.नितीन मुळीक, डॉ.तरुलता धनके व विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत महासंघाच्या कल्याण केंद्र इमारत बांधकाम निधी संकलनाची प्रगती, महासंघाचे कार्यसंस्कृती अभियान, पगारात भागवा अभियानाची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी, जिल्हा समन्वय समितीचे पुनर्गठन आदी विषयांवर चर्चा झाली.

पगारात भागवा अभियान..!


पगार, भत्ते, बढत्या, इत्यादी रास्त मागण्यांचा पाठपुरावा करतानाच, बहुसंख्य अधिकारी कार्यालयीन कामकाजही तेवढ्याच तत्परतेने करतात. तरीही, अधिकारी बांधवांबाबत जनमानसात नकारात्मक भावना दिसून येते. याचा अर्थ, आपली कार्यपद्धती आणि कार्यशैली सदोष तर नाही ना, याचे कठोर आत्मपरीक्षण करण्याची गरज निर्माण झाली आहे. या आत्मपरीक्षणामुळे अपेक्षित बदल घडविता येईल.

काही अधिकारी त्यांच्याकडे येणाऱ्या सामान्य नागरिकांना आस्थेवाईकपणे मार्गदर्शन करीत नाही; त्यांना लहान-सहान कामांसाठी वारंवार हेलपाटे घालायला लावतात, अशी भावना सामान्यतः जनमानसात अधिकाऱ्यांबाबतची आहे. काहीतरी दिल्याशिवाय अथवा वजन ठेवल्याशिवाय शासकीय यंत्रणा हलत नाही, अशी जनतेची धारणा झालेली आहे. वास्तव आणि वस्तुस्थिती यापेक्षा वेगळी असू शकते. मात्र, जनतेच्या मनात निर्माण झालेली अशी धारणा दूर सारणे, ही काळाची गरज आहे. ही पार्श्वभूमी विचारात घेता, लोककल्याणकारी योजनांची प्रभावीरित्या अंमलबजावणी आणि प्रशासन पारदर्शक व लोकाभिमुख ठेवण्यासाठी सर्वच अधिकारी कर्तव्यदक्ष आहेत, याची वस्तुनिष्ठ प्रचिती नागरिकांना आणून देणे गरजेचे आहे. आपली कार्यपद्धती संवेदनशील ठेवली तर ही बाब अशक्य नाही.

भ्रष्टाचार करताना रंगेहात पकडल्याची किंवा ज्ञात स्त्रोतांपेक्षा अधिक संपत्तीच्या चौकशीचे वृत्त महासंघ तसेच त्यांच्या कुटुंबियांसाठी दुःखदायक व क्लेशकारक असते. अशा घटनांमुळे सर्वच अधिकारी भ्रष्ट असल्याची वाईट प्रतिमा जनमानसात तयार झाली आहे. ही बाब महासंघाचीही प्रतिमा काळवंडणारी आहे. भ्रष्टाचाराची ही कीड घालविण्यासाठी राजपत्रित अधिकारी महासंघाने 'पगारात भागवा..!' हे अभियान पूर्ण विचारांती सुरू केले आहे.

या पार्श्वभूमीवर, पारदर्शक व संवेदनशील प्रशासनासाठी अधिकारी महासंघाने अंगिकारलेले 'पगारात भागवा' अभियान सर्व खात्यांतील अधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन यशस्वी करणे, हे जनतेबरोबरच आपल्यादेखील हिताचे आहे.

# पालकमंत्री जाहीर




दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ मुंबई(प्रतिनिधी)

महायुती सरकारने अखेर बहुप्रतिक्षित पालकमंत्र्यांची यादी जाहीर केली आहे. बीडमधील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी वाल्मिक कराडला पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणाचा राष्ट्रवादीचे मंत्री धनंजय मुंडे यांना चांगलाच फटका बसला आहे.

धनंजय मुंडे यांचा पत्ता कट करण्यात आला आहे. बीडचे पालक मंत्री अजित पवार असणार आहे. अजितदादांकडे बीड आणि पुण्याचे पालकमंत्रिपद देण्यात आलं आहे. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे गडचिरोलीचे पालकमंत्री असणार आहे. राज्यात फडणवीस सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार झाला. कोणत्या मंत्र्यांला कोणते खाते मिळणार हा ही विषय संपुष्टात आला तोच कोणत्या जिल्ह्याचे पालकमंत्री कोण असणार हा प्रश्न चर्चेला आला होता. महायुतीमध्ये खातेवाटपाच्या तिढ्यानंतर पालकमंत्री पदावरून वाद निर्माण झाल्याचे चित्र निर्माण झाले होते. आता मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर तोडगा काढला आहे. बीडमध्ये संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे धनंजय मुंडे यांचा पत्ता कट करण्यात आला आहे.

**तुमच्या जिल्ह्याचा पालकमंत्री कोण?**

गडचिरोली - देवेंद्र फडणवीस नागपूर - चंद्रशेखर बावनकुळे , ठाणे - एकनाथ शिंदे, पुणे - अजित पवार , बीड - अजित पवार ,सिंधुदुर्ग- नितेश राणे गडचिरोली - देवेंद्र फडणवीस नागपूर - चंद्रशेखर बावनकुळे ठाणे - एकनाथ शिंदेपुणे - अजित पवार बीड - अजित पवार अमरावती - चंद्रशेखर बावनकुळे अहिल्यानगर - राधाकृष्ण विखे पाटील वाशिम - हसन मुश्रीफ सांगली - चंद्रकांत पाटील, सातारा - शंभुराजे देसाई , छत्रपती संभाजी नगर संजय शिरसाट,जळगाव - गुलाबराव पाटील, यवतमाळ - संजय राठोड कोल्हापूर - प्रकाश आबिटकर, सह पालकमंत्री माधुरी मिसाळ , अकोला - आकाश फुंडकर , भंडारा - संजय सावकारे, बुलढाणा - मकरंद जाधव, चंद्रपूर - अशोक ऊईके, धाराशीव - प्रताप सरनाईक ,धुळे - जयकुमार रावल , गोंदिया - बाबासाहेब पाटील , हिंगोली - नरहरी झिरवळ , लातूर - शिवेंद्रसिंग भोसले , मुंबई शहर - एकनाथ शिंदे , मुंबई उपनगर -आशिष शेलार / सह पालकमंत्री मंगलप्रभात लोढा/ , नांदेड - अतुल सावे ,नंदुरबार - मानिकराव कोकाटे, नाशिक - गिरीश महाजन ,पालघर - गणेश नाईक , परभणी - मेघना बोर्डीकर,रायगड - अदिती तटकरे, सिंधुदुर्ग- नितेश राणे ,रत्नागिरी - उदय सामंत , सोलापूर - जयकुमार गोरे , वर्धा - पंकज भोयर , जालना - पंकजा मुंडे

# ठाणे जिल्हा परिषदेचा कलाविष्कार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ठाणे(प्रतिनिधी)

जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत अधिकारी व कर्मचारी यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी संस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आला होता. दि. १७ जानेवारी, २०२५ रोजी 'कलाविष्कार २०२५' सांस्कृतिक कार्यक्रम डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे संपन्न झाला. कार्यक्रमांचे उद्घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व प्रमुख पाहुणे कलाकार श्रावणी महाजन याच्या हस्ते करण्यात आले.

कलेला वाव मिळण्यासाठी जिल्हा परिषद आयोजित कलाविष्कार २०२५ कार्यक्रम अधिकारी-कर्मचारी यांच्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी हा मंच महत्वाचा असून सर्वांनी आनंदाने सहभाग नोंदवावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले. कार्यक्रमासाठी सामान्य प्रशासन विभागाने पुढाकार घेऊन उत्तम कामगिरी केल्याबद्दल उप मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे व सामान्य प्रशासन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी अभिनंदन केले.

कार्यक्रमाची सुरुवात दिप प्रज्वलन करून, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यावेळी प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत विभाग प्रमोद काळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरुडकर, स्टेट बँक ऑफ इंडिया येथील डेप्युटी जनरल मॅनेजर सुरजीत त्रिपाटी, इंडियन बँक येथील डेप्युटी जनरल मॅनेजर रविंद्र सिंग व बँक ऑफ बडोदा येथील डेप्युटी जनरल मॅनेजर मनोज गुप्ता, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग प्रमुख संदिप चव्हान, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, शिक्षणाधिकारी माध्यमिक ललिता दहितुले, शिक्षणाधिकारी प्राथमिक बाळासाहेब राक्षे, महिला व बाल विकास विभाग प्रमुख संजय बागुल, बांधकाम विभाग प्रमुख संदिप चव्हाण, जिल्हा कृषी अधिकारी एम. एम. बाचोटीकर, लघुपाट बंधारे विभाग प्रमुख दिलीप जोकार, सर्व तालुकास्तरीय गट विकास अधिकारी, विभाग प्रमुख तसेच तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



**अधिकारी-कर्मचारी यांच्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी हा मंच महत्वाचा - मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे**

# जमीन खरेदी प्रकरणाची अप्पर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत चौकशी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/मुंबई(प्रतिनिधी)

पश्चिम महाराष्ट्रातील कोयना खोऱ्यातील झाडांणी गावातील संवेदनशील भागातील जमीन खरेदी प्रकरणी आता अप्पर जिल्हाधिकाऱ्यांच्या समितीमार्फत चौकशी होणार आहे. यासंदर्भात चार आठवड्यांत अहवाल सादर करण्याचे निर्देश राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाचे सहसचिव अजित देशमुख यांनी दिले आहेत. याबाबतचे परिपत्रक महसूल विभागाने १३ जानेवारी रोजी जारी केले आहे.

राज्यातील पश्चिम महाराष्ट्रातील कोयना खोऱ्यासह पुणे, रायगड व नंदुरबार जिल्ह्यांत शासकीय सेवेतील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर जमीन खरेदी केल्याचे उघड झाले आहे. सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर तालुक्यातील झाडांणी गावात सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या कोयना पाणलोट क्षेत्रात तब्बल ६२० एकर जमीन जीएसटी आयुक्त चंद्रकांत वळवी, पियुष बोंगिरवार, अनिल वसावे आणि त्यांच्या नातेवाईकांनी खरेदी केल्याचे समोर आले आहे.

**जमिनी खरेदीतील अनियमितता:**तक्रारीनुसार, संबंधित अधिकाऱ्यांनी या जमिनी शासन जमा होणार असल्याचे सांगून शेतकऱ्यांकडून अल्प दरात खरेदी केल्या. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले होते. वाई प्रांताधिकाऱ्यांनी प्राथमिक चौकशी अहवाल सादर केला. त्यानुसार, चंद्रकांत वळवी, पियुष बोंगिरवार आणि अनिल वसावे यांनी कमाल जमीन धरणा कायद्याचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आले.

**शासनाचा पुढील निर्णय महत्त्वाचा:**या चौकशीच्या अहवालानंतर संबंधित अधिकाऱ्यांची अतिरिक्त जमीन शासन जमा करेल का, याकडे लक्ष लागले आहे. तसेच, या प्रकरणानंतर इतर अधिकाऱ्यांच्या जमीन खरेदीतील अनियमितता उजेडात येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# गीतासार



**अधर्माभिभवात्कृष्ण**
**प्रदुष्यन्ति कुलस्त्रियः ।**
**स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते**
**वर्णसङ्करः । १-४१ ।**

अर्थ

हे कृष्णा, पाप अधिक वाढल्याने कुळातील स्त्रिया अतिशय बिघडतात आणि हे वार्ष्णेया, स्त्रिया बिघडल्या असता वर्णसंकर उत्पन्न होतो. । १-४१ ।

**सङ्करो नरकायैव कुलघ्नानां**
**कुलस्य च ।**
**पतन्ति पितरो ह्येषां**
**लुप्तपिण्डोदकक्रियाः ।**
**१-४२ ।**

**अर्थ**

वर्णसंकर हा कुळाचा नाश करणाऱ्यांना आणि कुळाला नरकालाच नेतो. कारण श्राद्ध, जलतर्पण इत्यादींना मुकलेले यांचे पितर अधोगतीला जातात. । १-४२ ।

**दोषैरेतैः कुलघ्नानां**
**वर्णसङ्करकारकैः ।**
**उत्साद्यन्ते जातिधर्माः कुल**
**धर्माश्च शाश्वताः । १-४३ ।**

**अर्थ**

या वर्णसंकर करणाऱ्या दोषांमुळे परंपरागत जातिधर्म व कुळधर्म उध्वस्त होतात. ।१-४३ ।

**उत्सन्नकुलधर्माणां**
**मनुष्याणां जनार्दन ।**
**नरकेऽनियतं वासो**
**भवतीत्यनुशुश्रुम ।१-४४ ।**

**अर्थ**

हे जनार्दना, ज्यांचा कुळधर्म नाहीसा झाला आहे, अशा माणसांना अनिश्चित काळापर्यंत नरकात पडावे लागते, असे आम्ही ऐकत आलो आहोत. । १-४४ ।

# महाराष्ट्राचा विवेकी आवाज – प्रा डॉ एन डी पाटील



फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचा पुरोगामी वारसा चालवणारे सत्यशोधक विचारवंत प्रा डॉ एन डी पाटील यांचा आज तिसरा स्मृतिदिन. तीन वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे १७ जानेवारी २०२२ रोजी प्रा डॉ एन डी पाटील यांचे निधन झाले होते. प्रा डॉ एन डी पाटील यांचे पूर्ण नाव नारायण ज्ञानदेव पाटील असे असून त्यांचा जन्म १५ जुलै १९२९ रोजी सांगली जिल्ह्यातील नागाव मधील ढवळी येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी पुणे विद्यापीठातून अर्थशास्त्रातून एम ए आणि एल एल बी चे शिक्षण घेतले.

प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९५४ ते १९५७ या कालावधीत सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य केले. याशिवाय त्यांनी कमवा आणि शिका योजनेचे रेक्टर म्हणूनही काम पाहिले. १९६० साली ते इस्लामपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्राचार्य म्हणून रुजू झाले. त्यांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. कर्मवीरांच्या विचारातून प्रेरणा घेऊनच त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. शिवाजी विद्यापीठाचे पहिले सल्लागार म्हणूनही त्यांनी काम पाहिले. ( १९६२ ) त्यानंतर शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले.

प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९७६ ते १९७८ या कालावधीत शिवाजी विद्यापीठात समाजशास्त्र विभागाचे डीन म्हणूनही काम पाहिले.

याचबरोबर १९९१ साली त्यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षण आयोगाचे सदस्य म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील हे १९५९ पासून रयत शिक्षण संस्थेचे कौन्सिल मॅनेजमेंट सदस्य म्हणून कार्यरत होते. १९९० साली रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमनपदी त्यांची नियुक्ती झाली. प्रा डॉ एन डी पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्य कर्तुत्वाचा आगळा वेगळा ठसा उमटवला.

शैक्षणिक क्षेत्राप्रमाणेच राजकीय क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्य कर्तुत्वाने वेगळा ठसा उमटवला. १९४८ साली त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. त्यानंतर १९५७ साली त्यांनी मुंबईतील गिरणी कामगारांच्या संघटनेचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले.

प्रा डॉ एन डी पाटील यांनी महाराष्ट्राच्या विधान परिषदेत १८ वर्ष सदस्य म्हणून काम केले. १९७८ ते १९८० या काळात ते महाराष्ट्राचे सहकार मंत्री होते. १९८५ साली ते कोल्हापूर मतदार संघातून विधानसभेचे सदस्य म्हणूनही निवडून गेले. १९९९ ते २००२ या काळात ते लोकशाही आघाडी सरकारचे निमंत्रक होते.

आपले आयुष्य समाज कार्यासाठी घालवणाऱ्या प्रा डॉ एन डी पाटील यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. अनेक विद्यापीठाने त्यांना मानाची डि. लिट पदवी देऊन गौरवले.प्रा डॉ एन डी पाटील यांनी अनेक विषयांवर सखोल लेखन केले. शेती जमिनीवरील कमाल मर्यादा आणि महाराष्ट्र सरकारचा प्रतिगामी कायदा, समाज विकास योजनेचे वस्त्रहरण, वाढती महागाई आणि ग्राहकांची ससेहोलपट, काँग्रेस सरकार आणि शेतकऱ्यांची लूट, शेतीमालाला किफायतशीर किंमतीची हमी आणि घाऊक व्यापाराचे राष्ट्रीयकरण, महाराष्ट्र सरकारच्या श्वेतपत्रिकेचे कृष्णस्वरूप, शेवटी हे शिक्षण आहे तरी कोणासाठी?, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ही त्यांनी लिहिलेले पुस्तके गाजली.

प्रा डॉ एन डी पाटील यांनी अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रातही काम केले. त्यांची मते ठाम होती. महाराष्ट्राच्या गेल्या सत्तर वर्षांच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात प्रा. डॉ एन डी पाटील हे एक धडाडिचे आणि लढाऊ नेते म्हणून ओळखले जातात. प्रा डॉ एन डी पाटील म्हणजे महाराष्ट्राचा विवेक आवाज. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचा पुरोगामी आवाज हरपला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीची मोठी हानी झाली. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**




# नवा बटाटा व जुना बटाटा

## आरोग्यासाठी फायदेशीर काय ?

भारतीय स्वयंपाकघरातील बहुतेक भाज्या बटाट्याशिवाय तयार होत नाहीत. बटाट्याच्या वाटाण्यापासून ते बटाट्याच्या मेथीपर्यंत, बटाटा कोबीपर्यंत सर्वच पदार्थांची चव बटाट्याशिवाय अपूर्ण राहते. पण बऱ्याच वेळा भाजीची चव वाढवण्यासाठी घातलेला बटाटा चवीला गोड असला तरी भाजीची चव बिघडते. अशा परिस्थितीत बटाटे खरेदी करताना काही गोष्टी लक्षात ठेवल्या तर बटाटा चवीला गोड आहे की नाही हे सहज कळू शकते.

बटाट्याचा वापर प्रत्येक घरात केला जातो आणि तो आपल्या आहाराचा एक महत्त्वाचा भाग आहे. पण बटाट्याच्या प्रकारातही फरक असतो हे तुम्हाला माहीत आहे का? होय, नवीन बटाटे आणि जुने बटाटे यांच्यात चव, पोत आणि वापरात फरक आहे. हे दोन बटाटे एकमेकांपासून कसे वेगळे आहेत ते जाणून घेऊया.

### बटाटा गोड आहे की नाही हे कसे ओळखावे?

-नव्या बटाट्याची त्वचा अतिशय पातळ आणि मऊ असते. इतके की नुसत्या चोळण्याने सोलून निघते. ही साल कालांतराने घट्ट होते. तर जुने बटाटे सुरीने सोलून काढावे लागतात.

-रताळ्याच्या सालीखाली हिरवा रंग दिसू लागतो. हे क्लोरोफिलमुळे होते. बटाट्यातील हिरवटपणा साखरेचे प्रमाण निश्चितपणे दर्शवते.

- बटाट्याचा गोडवा वाढला की त्याला कोंबही फुटू लागतात. जे बटाटे फुटायला सुरुवात करतात ते नक्कीच गोड असतील.

### जुने बटाटे कसे ओळखावे--

बटाट्यामध्ये असलेले कार्बोहायड्रेट हळूहळू साखरेत बदलू लागते.

-जुन्या बटाट्याची चव नवीन बटाट्यांपेक्षा जास्त चांगली नसते.

-जुन्या बटाट्यांवर जास्त सूर्यप्रकाश पडला की त्यांची चव बदलू लागते.

-जेव्हा बटाटा जुना होतो आणि पिकायला लागतो तेव्हा त्यात असलेले स्टार्च ग्लुकोजमध्ये बदलू लागते आणि त्याला एक प्रकारचा गोडवा येतो जो सामान्यतः भाज्या किंवा खारट पदार्थांना चांगला लागत नाही.

### नवीन आणि जुन्या बटाट्याच्या चवीतील फरक

- नवीन बटाट्यातील पौष्टिकता आणि चव यामध्ये खूप फरक असतो. तर जुने बटाटे थोडे कठीण असू शकतात आणि चांगली चव येण्यासाठी ते जास्त शिजवावे लागतात.

- नवीन बटाटे जास्त काळ साठवून ठेवता येतात, ते लवकर खराब होत नाहीत. त्याच वेळी, जुने बटाटे जास्त काळ साठवले जाऊ शकत नाहीत कारण ते लवकर खराब होतात.

### बटाटे खरेदी करताना या गोष्टी लक्षात ठेवा-

बटाटे विकत घेताना ते दाबा आणि जर ते मऊ वाटले तर ते विकत घेऊ नका, कारण असे बटाटे पिकलेले असू शकतात. नेहमी टणक आणि मध्यम आकाराचे बटाटे खरेदी करा.

### जुने बटाटे चव आणि टिकाऊपणा

जुन्या बटाट्याची चव वेगळी असते, जी कोणत्याही डिशमध्ये खोल आणि मसालेदार असते. या बटाट्याची साल जाड आणि कडक असते आणि त्यांची रचनाही थोडी मजबूत असते. हे बऱ्याच काळासाठी साठवले जाऊ शकतात आणि वर्षभर बाजारात उपलब्ध असतात. हे बटाटे सामान्यतः फ्राईज, चिप्स किंवा बेकिंगमध्ये वापरले जातात, कारण ते चांगले क्रंच देतात.

### आरोग्याच्या दृष्टीने फरक

दोन्ही प्रकारच्या बटाट्यांचे वेगवेगळे फायदे आहेत. नवीन बटाट्यामध्ये स्टार्च कमी आणि पाणी जास्त असते, जे पचनासाठी फायदेशीर असते. त्याच वेळी, जुन्या बटाट्यांमध्ये जास्त स्टार्च असते, जे ऊर्जा पातळी राखण्यास मदत करते. त्यामुळे दोन्ही बटाटे आपापल्या परीने निरोगी असू शकतात.

**आरोग्य टिप्स**

# केळीची साल खा हाडे मजबूत करा

**केळ्याच्या सालीत पोटॅशियम आणि कॅल्शियम यासारखे महत्त्वाचे पोषणतत्त्व असतात, जे हाडांच्या मजबुतीसाठी अत्यंत उपयुक्त असतात. पोटॅशियम हृदयाच्या आरोग्यासाठी महत्त्वाचे असून ब्लड प्रेशर नियंत्रणात ठेवण्यासाठी मदत करते.**

केळ्याच्या सालीचा उपयोग कसा करावा?

**केळ्याची साल थेट खाणे कठीण असते कारण ती कठीण व कडवट असते. त्यामुळे ती स्मूदी, भाज्यांमध्ये किंवा त्याची सुकवून पावडर करून खाण्यासाठी वापरली जाऊ शकते. स्मूदीमध्ये केळ्याच्या सालीचा समावेश केल्यास त्याचा कडवटपणा कमी होतो आणि ती सहज पचते. भाज्यांमध्ये केळ्याच्या सालीचा समावेश केल्यास ते पोषणमूल्य वाढवण्यास मदत करते. नॉन-ऑरगॅनिक केळ्याच्या सालींचा वापर करण्यापूर्वी त्याला चांगल्या प्रकारे धुणे गरजेचे आहे कारण त्यावर कीटकनाशके असण्याची शक्यता असते. त्यामुळे सालीचा वापर करताना स्वच्छतेची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.**

**केळ्याच्या सालीचा आहारात समावेश केल्यास अनेक आरोग्यविषयक फायदे मिळतात. झोप न येणे, ब्लड प्रेशर नियंत्रित ठेवणे, हृदयाचे आरोग्य सुधारणे आणि वजन कमी करणे अशा अनेक समस्यांवर केळ्याची साल उपयुक्त ठरते. मात्र, फक्त याच सालीतून पोषणमूल्ये मिळतात या भ्रमात राहू नये. डॉक्टरांच्या सल्ल्यानेच याचा आहारात समावेश करावा.**

# फिजीओथेरेपी केंद्र दिव्यांगासाठी वरदान

## - मा. खासदार डॉ.श्रीकांत एकनाथ शिंदे



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी)**

कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या माध्यमातून सुमारे ७ हजार स्केअर फुट जागेमध्ये उभारलेले फिजीओथेरेपी आणि बहुविद्याशाखीय पुर्नवसन केंद्र हे दिव्यांग व्यक्तींसाठी वरदान होय असे प्रतिपादन मा.खासदार डॉ.श्रीकांत एकनाथ शिंदे यांनी केले. कल्याण डोंबिवली महानगर पालिकेने सांगळेवाडी कल्याण (पश्चिम) येथे उभारलेल्या फिजीओथेरेपी आणि बहुविद्याशाखीय पुर्नवसन केंद्राच्या लोकार्पण समयी त्यांनी हे प्रतिपादन केले.

कल्याण व नजीकच्या परिसरातील दिव्यांग व्यक्तींना फिजिओथेरपी किंवा इतर उपचारासाठी खाजगी हॉस्पिटल शिवाय पर्याय नव्हता त्यामुळे महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांनी **initiative** घेऊन दिव्यांग व्यक्तींसाठी सुरु केलेल्या या आरोग्य सुविधेसाठी त्यांनी आयुक्तांचे कौतुक केले. दिव्यांग व्यक्तींना लागणारी उपकरणे देण्याचे विचार करु, आणि येणा-या कालात अधिक चांगली कामे करु, अशा शब्दात त्यांनी उपस्थितांना आश्वासित केले.कल्याण पूर्वेच्या मा.आमदार सुलभा गायकवाड आणि कल्याण ग्रामीणचे मा.आमदार राजेश मोरे यांनी देखील त्यांच्या भाषणात महापालिकेचा दिव्यांग सेंटर उपक्रम हा कौतुकास्पद असल्याचे सांगत, या उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या.

दिव्यागांसाठी महापालिकेने एक पाऊल पुढे उचलले असून, सुमारे ३५०० दिव्यांग व्यक्तींना महा पालिकेकडून निवृत्त वेतन दिले जाते, अशा शब्दात अपंग विकास महासंघाचे अध्यक्ष अशोक भोईर यांनी महा पालिकेचे प्रशंसा केली.

दिव्यांग व्यक्तींच्या सर्वांगीण विकासाकरिता विविध उपक्रम योजना यांची नियोजन करून दिव्यांग व्यक्तींचे सक्षमीकरण करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महानगरपालिकेने **PPP** तत्त्वावर हा प्रकल्प सुरू केला असल्याची माहिती महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड यांनी आपल्या प्रास्ताविकात दिली.या लोकार्पण समयी परिमंडळ -३ चे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे, शहर अभियंता अनिता परदेशी, महापालिकेच्या समाज विकास विभागाचे उपायुक्त संजय जाधव ,कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे,कल्याण तहसील दार सचिन शेजाळ, महापालिकेचे माजी पदाधिकारी, माजी पालिका सदस्य ,नागरिक व इतर मान्यवर उपस्थित होते. या फिजीओथेरेपी आणि बहुविद्याशाखीय पुर्नवसन केंद्रात महापालिकेकडे नोंदणीकृत असलेल्या विविध व्याधीग्रस्त दिव्यांगांना कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमार्फत मे. आधार रिहॅबिलिटेशन सर्विस या सेंटरद्वारे अनुषंगिक आरोग्य सुविधा निशुल्क पुरविण्यात येणार आहे. महा पालिकेकडे नोंदणीकृत नसतील अशा दिव्यांगाना व महापालिका क्षेत्रा बाहेरील दिव्यांग व्यक्तींना रु. ५००/- या दराने विविध उपचारांचा लाभ या सेंटरमध्ये घेता येईल.

# समाज विकासासाठी चांगल्या आरोग्याची गरज - आ. निरंजन डावखरे

## ज्ञानोत्सवाच्या माध्यमातून मुलांच्या कलागुणांना मिळाला वाव

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ ठाणे(प्रतिनिधी)**

जागतीक पातळीवर भारत प्रगती करत असून भारताची अर्थव्यवस्था जगात पाचव्या क्रमांकावर आहे. विकास मोठ्या प्रमाणावर होत आहे. समाज विकसित होण्यासाठी त्याचे आरोग्य चांगले असणे गरजेचे आहे. त्यासाठी केंद्र व राज्य शासन आरोग्याविषयक अनेक योजना राबत आहेत. त्याचे सर्व फॉर्म आपले कार्यालयातून भरले जात आहेत.सध्याची संगणकाचे युग असून संगणकाचे फायदे आणि तोटे सुद्धा आहे त्याचा वापर आपण कसा करायचा हे आपल्या वरती अवलंबून आहे. एआय व इंस्टाग्राम हे एक प्लॅटफॉर्म निर्माण झाले आहे. त्या माध्यमातून आपण छोटे छोटे शैक्षणिक व्हिडिओ तयार करून आपण आपल्या क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण करू शकता. असे कोकण पदवीधर मतदार संघाचे आमदार निरंजन डावखरे यांनी ज्ञानोत्सवामध्ये मार्गदर्शन करताना सांगितले.




विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून ज्ञानोदय शिक्षण प्रसारक समिती संचलित ज्ञानोदय आयटी कॉलेज व बीएड कॉलेज ठाणे यांचे संयुक्त विद्यमाने प्राचार्य व संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रेमचंद्र तिवारी यांचे मार्गदर्शनाखाली शिक्षक अंकित तिवारी यांनी कॉलेजचे मैदान, सावरकर नगर, ठाणे येथे दि.१७ व १८ जानेवारी २०२५ रोजी विकसीत भारत अभियान अंतर्गत ज्ञानोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कोकण पदवीधर मतदार संघाचे आ. निरंजन डावखरे व पत्रकार अर्जुन चेमटे सह संस्था अध्यक्ष प्रा. डॉ. प्रेमचंद्र तिवारी, संस्थेचे सदस्य विनय तिवारी, लालबहादूर शास्त्री विद्यालयाचे संस्थापक वीरेंद्र यादव, बीएस्सी आयटी समन्वयक देवयानी वसिष्ठा, बीएड कॉलेजच्या समन्वयक मीना पाटील, उमाकांत शिंपी, प्रा.जे.पी. शुक्ला उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या ज्ञानोत्सवामध्ये १८ प्रकारच्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शिवाजी जगदाळे, अनिकेत चौहान व खुशी पांडे यांनी केले. तर आभार समन्वयक मीना पाटील यांनी मांडले.

# टोरेस पाठोपाठ आणखी एक आर्थिक घोटाळा उघड

टोरेस घोटाळा पाठोपाठ मुंबईत आणखी एक मोठा घोटाळा समोर आला आहे, 'मनीएज ग्रुप ऑफ कंपनी' च्या चार भागीदारांनी ३ हजार गुंतवणूकदारांना १०० कोटींचा गंडा घातल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी मुलुंड पोलिसांनी मनीएज ग्रुप ऑफ कंपनीज आणि त्याच्या चार भागीदारांविरुद्ध गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. **(Mumbai Scam)** याप्रकरणी हरिप्रसाद वेणुगोपाल आणि प्रणव रावराणे या दोन साथीदारांना अटक करण्यात आली आहे. या दोघांना न्यायालयात हजर केले असता त्यांना २२ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली. पुढील कारवाईसाठी तपास आता आर्थिक गुन्हे शाखेकडे **(EOW)** वर्ग करण्यात आला आहे. **(Mumbai Scam)** आर्थिक गुन्हे शाखेच्या सूत्रांनुसार, अनधिकृत पोर्टफोलिओ व्यवस्थापन सेवांद्वारे सुमारे ३ हजार गुंतवणूकदारांना २४ टक्के वार्षिक परतावा देण्याचे आश्वासन देऊन आमिष दाखवण्यात आले. तक्रारीत राजीव जाधव, हरिप्रसाद वेणुगोपाल, प्रणव रावराणे आणि प्रिया प्रभू आणि इतर साथीदारांची नावे आहेत. या व्यक्तींनी कथितपणे त्यांच्या फसव्या योजना अंमलात आणण्यासाठी -- **MoneyEdge Investment, MoneyEdge FinCorp, MoneyEdge Realtors** आणि **MoneyEdge Capital Services -** या अनेक संस्थांच्या अंतर्गत कार्यरत आहेत. २०13 मध्ये स्थापन झालेल्या, मनीएज ग्रुप ऑफ कंपनीजचे कार्यालय शास्त्री नगर, मुलुंड पश्चिम येथे होते. **(Mumbai Scam)** हा घोटाळा तेव्हा उघडकीस आला जेव्हा कांदिवली येथील व्यापारी, राहुल पोद्दार, यांनी २०२२ ते २०२४ दरम्यान आपल्या कुटुंबासह आणि मित्रांसह २ कोटी ८० लाखाची गुंतवणूक केली, मे २०२४ मध्ये परतावा मिळणे थांबवले. पोद्दार यांनी ऑक्टोबर २०२४ मध्ये मुलुंड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. अन्य हजारो गुंतवणूकदारांनाही अशाच



नुकसानीचा सामना करावा लागल्याचे तपासात समोर आले आहे. **(Mumbai Scam)** पोर्टफोलिओ व्यवस्थापन सेवा देत असूनही, समूहाकडे सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया **(SEBI)** कडून अनिवार्य परवाना नव्हता. त्याऐवजी, ते मुद्रा क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड आणि जीवन मल्टीस्टेट मल्टीपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड यांच्या समर्थनाखाली कार्यरत होते.विवाद आणि घोटाळा उघड २०२४ मध्ये कंपनीतील अंतर्गत वादामुळे घोटाळा उघडकीस आणून रिटर्न भरण्यात अडथळा निर्माण झाला. जानेवारी २०२२ ते मे २०२४ पर्यंत, गुंतवणूकदारांना नियमित परतावा मिळाला, परंतु मे २०२४ नंतर देयके बंद झाली. पोद्दारच्या तक्रारीमुळे मोठ्या फसवणुकीचा खुलासा होऊन तपास सुरू झाला. आर्थिक गुन्हे शाखेच्या अधिकारी यांना संशय आहे की वळवलेला निधी इतर उपक्रमांमध्ये गुंतवला गेला. वेणुगोपाल आणि रावराणे हे दोन भागीदार कोठडीत असले तरी आणखी अटक होण्याची शक्यता आहे. अधिकारी आरोपींशी संबंधित मालमत्ता ओळखून जप्त करण्याचे काम करत आहेत. **(Mumbai Scam)** पोलिस उपायुक्त संग्रामसिंग निशानदार यांच्या मार्गदर्शनाखाली हा तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक दत्तात्रय बाकारे आणि निरीक्षक अर्जुन पडवळे करत आहेत.

# कल्याणमध्ये क्रेडाई एमसीएचआयचा 'गृहोत्सव'

## १६ लाखांपासून २ कोटीपर्यंतची घरे उपलब्ध
## कल्याणात २३ जानेवारीपासून प्रॉपर्टी एक्स्पोचे आयोजन




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी)**

गेल्या काही वर्षांमध्ये कल्याण आणि डोंबिवलीच्या आसपास सुरू असणारी मोठ्या प्रमाणावरील पायाभूत विकासकामे आणि विशेषतः कल्याणच्या आसपास वेगाने सुरू असणारे महत्त्वाकांक्षी एक्स्प्रेस वेचा विचार करता कल्याणला मेजर कनेक्टिव्हिटी हबचा दर्जा प्राप्त होणार आहे. त्यामुळे नवीन घरं घेण्यासाठी कल्याणला पसंती मिळत असून येत्या काळात हे मुंबई ठाण्यानंतरच सर्वात मोठं शहर बनेल असा विश्वास एमसीएचआयच्या पत्रकार परिषदेत बांधकाम व्यावसायिकांनी व्यक्त केला.

येत्या २३ जानेवारीपासून कल्याणात क्रेडाई एमसीएचआयचे १४ वे प्रॉपर्टी एक्स्पो भरणार आहे. त्याची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत कल्याणातील प्रमुख बांधकाम व्यावसायिकांनी या एक्सपोची या शहराचे भविष्य, भविष्यातील गरजा आणि अस्तित्वातील अडचणी यांच्यावरही प्रकाशझोत टाकला.

क्रेडाई एमसीएचआय कल्याण डोंबिवलीमार्फत गेल्या १४ वर्षांपासून जनतेला परवडतील अशी त्यांच्या स्वप्नातील घरं देण्याचे काम सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून २३ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या या प्रॉपर्टी एक्स्पोमध्ये यंदा ५० हुन अधिक नामांकित विकासकांचे १५० हून अधिक प्रोजेक्ट एकाच छताखाली पाहायला मिळणार आहेत. क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके मैदान लालचौकी येथे सकाळी ११ ते रात्री ९ पर्यंत हे १४ वे प्रॉपर्टी प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

या प्रदर्शनात कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, बदलापुर, टिटवाळा, शिळफाटा, ठाणे परिसरातील सर्व सुविधायुक्त घरे घेण्याची संधी प्राप्त झाली आहे. विशेष म्हणजे अवघ्या १६ लाखांपासून ते थेट २ करोडापर्यंत किमतीची घरे या प्रदर्शनात उपलब्ध असणार असल्याची माहिती रवी पाटील यांनी दिली. तसेच गेल्या वर्षाचा अंदाज बघता या प्रदर्शनाला २५ हजाराहून अधिक नागरीक भेट देतील असा अंदाज आहे. त्याशिवाय प्रत्येक तासाला लकी ड्रॉ आणि स्पॉट बुकिंग डिस्काउंट अशी विविध बक्षिसे जिंकण्याची संधीही नागरिकांना मिळणार आहे.

या प्रॉपर्टी एक्स्पोचे उद्घाटन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार सुरेश (बाळयामामा) गोपीनाथ म्हात्रे, माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, आमदार राजेश मोरे, आमदार किसन कथोरे, आमदार विश्वनाथ भोईर, आमदार रविंद्र चव्हाण आणि कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्यासह अनेक मान्यवर या प्रदर्शनाला भेट देणार असल्याची माहिती एमसीएचआयचे अध्यक्ष राजेश गुप्ता आणि सचिव सुनील चव्हाण यांनी दिली.

# सिडको कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसाठी आ.मंदा म्हात्रेंचा पुढाकार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ नवी मुंबई(प्रतिनिधी)**

'मुंबई लेबर युनियन' (संलग्न हिंदू मजदूर सभा) तर्फे 'सिडको' महामंडळातील ३०० कर्मचाऱ्यांनी विविध मागण्यांकरिता 'सिडको' **(CIDCO)** भवनसमोर पुकारलेल्या धरणे आंदोलनाला आमदार मंदा म्हात्रे यांनी गुरुवार, दि. १६ जानेवारी रोजी उपस्थिती दर्शवली. कर्मचाऱ्यांच्या मागण्या ऐकून घेतल्या व सहव्यवस्थापकीय संचालक राहुल कर्डीले यांच्या दालनात तातडीची बैठक घेतली. या कर्मचाऱ्यांचा मागण्या लवकर पूर्ण करण्यात याव्यात,



असे आदेश आमदार म्हात्रे यांनी सहव्यवस्थापकीय संचालक कर्डीले व उपस्थित संबंधित अधिकाऱ्यांना दिले. यावेळी कर्डीले यांनी या मागण्यांवर सकारात्मकता दाखवत या मागण्या लवकरच पूर्ण केल्या जाणार असल्याचे सांगितले. यावेळी उपाध्यक्ष ॲड. सुरेश ठाकूर, साहाय्यक चिटणीस सुजित पाटील, शिस्त मंडळ, प्रमदा भिडवे, कार्मिक अधिकारी प्राजक्ता कुलकर्णी उपस्थित होते.

'सिडको' ही एक भारतीय शहर नियोजन संस्था आहे. 'सिडको'ने नवी मुंबई शहराचे नियोजन आणि निर्मिती केली आहे. यानिर्मिती मागे कर्मचाऱ्यांच्या मोठा सहभाग आहे. गेल्या १५ वर्षांपासून 'सिडको' आस्थापनामध्ये स्थानिक प्रकल्पग्रस्त कर्मचारी अविरत सेवा बजावित आहेत. बहुतांश कर्मचाऱ्यांचे इतर ठिकाणी नोकरी करण्याचे वय निघून गेले आहे. तरी हे कर्मचारी 'सिडको' आस्थापनांमध्ये आपली सेवा बजावत आहेत. याच अनुषंगाने विविध मागण्यांसाठी कर्मचाऱ्यांनी हे आंदोलन केले.

# गड किल्ल्यांवरील अतिक्रमणे रोखण्यासाठी जिल्हास्तरीय कमिटी

## - सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ मुंबई(प्रतिनिधी)**

गड किल्ल्यांवरील अतिक्रमण काढण्यासाठी आणि नव्याने अतिक्रमणे होऊ नयेत यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कमिटी गठीत करण्यात आल्याची माहिती राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी आज माध्यमांशी संवाद साधताना दिली.

महाराष्ट्र राज्यात सध्या भारतीय पुरातत्व सर्वेक्षण अंतर्गत एकूण ४७ केंद्र संरक्षित किल्ले आणि पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनलय अंतर्गत ६२ राज्य संरक्षित किल्ले आहेत. केंद्र व राज्य संरक्षित किल्ल्यांचे जतन व संवर्धन करण्याकरीता व हा सांस्कृतिक वारसा सुस्थितीमध्ये ठेवण्याकरीता त्यावर अतिक्रमण होऊ नये यादृष्टीने दक्षता घेणे आवश्यक आहे. केंद्र व राज्य संरक्षित किल्ले आणि सुमारे ३०० असंरक्षित गड किल्ल्यांच्या ठिकाणी अतिक्रमण होत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. यामुळे केंद्र व राज्य संरक्षित किल्ले आणि असंरक्षित गड किल्ले यांच्या ठिकाणी कायदा व सुव्यवस्था धोक्यात येणे, वास्तुच्या सौंदर्यास बाधा पोहोचू नये यासाठी माननीय मुख्यमंत्री यांच्या सूचनांनुसार जिल्हा स्तरावरील केंद्र व राज्य संरक्षित आणि असंरक्षित गड किल्ल्यांवरील अतिक्रमणे दूर करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येत आहे.

**समितीचे सदस्यः**

संबंधीत नागरी भागातील पोलीस आयुक्त, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलिस अधिक्षक, आयुक्त महानगरपालिका, मुख्याधिकारी, नगरपरिषद, नगरपालिका, नगरपंचायत, वनक्षेत्र असेल तेथे संबंधित उप वनसंरक्षक, संबंधित अधिक्षण पुरतत्वविद्या, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण भारत सरकार, पुरातत्व सहाय्यक संचालक विभागीय कार्यालय महाराष्ट्र राज्य पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, प्रादेशिक बंदर अधिकारी महाराष्ट्र सागरी मंडळ, निवासी उप जिल्हाधिकारी

**समितीची कार्यकक्षाः**

३१ जानेवारी २०२५ पर्यंत गठीत करण्यात आलेल्या समितीने आढावा घेऊन कोणकोणत्या गड - किल्ल्यांवर अतिक्रमणे आहेत याची किल्लानिहाय यादी तयार करावी, आणि ती यादी तातडीने शासनास सादर करावी.

१ फेब्रुवारी २०२५ ते ३१ मे २०२५ पर्यंत कालबद्ध पद्धतीने अतिक्रमणे हटविण्याचे काम करावे व वेळोवेळी केलेल्या कामांचा अहवाल शासनास सादर करावा.

सर्व अतिक्रमणे हटविल्यानंतर पुनःश्च त्याठिकाणी अतिक्रमणे होणार नाहीत याची दक्षता समितीने घ्यावी.

सदर समितीची बैठक दरमहा आयोजित करुन समितीचा मासिक अहवास शासनास सादर करावा.

# केडीएमसीतर्फे प्रसाधनगृहाचे लोकार्पण



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी)**

आजच्या युगात महिला देखील पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून सर्व क्षेत्रात आपली जबाबदारी लीलया पेलत आहेत, या महिलांच्या सुविधेसाठी कल्याण डोंबिवली महापालिकेच्या महिला आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांच्या संकल्पनेतून कल्याण रेल्वे स्थानक परिसरात, कपोते वाहनतळ च्या आवारात अत्याधुनिक, सुसज्ज असे प्रसाधनगृह महिलांच्या सेवेत दाखल करण्यात आले आणि काल सायंकाळी या प्रसाधनगृहाचे लोकार्पण मा. खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे, मा. आमदार सुलभा गायकवाड आणि मा. आमदार राजेश मोरे यांचे शुभहस्ते संपन्न झाले. सदर प्रसाधनगृह हे ग्लोबल स्टार टॉयलेट मानांकन प्राप्त असून, यामध्ये शौचालय स्वच्छता व महिलांची सुरक्षितता यास प्राधान्य देण्यात आले आहे. सदर रुममध्ये ४ स्मार्ट वॉशरूम, बेबीकेअर रुम, चेजींग रुम, सॅनेटरी पॅड वेन्डींग मशीन तसेच फीडींग रुमचा समावेश आहे. सदर **woloo powder room** मध्ये स्वच्छता व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने इंटरनेट ऑपरेटींग सिस्टिम बसविण्यात आलेली आहे. या आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे **Woloo Assurance of Hygiene (WAH)** महिलांच्या स्वच्छतेबाबत हमी आहे. या **Woloo Powder Room** मध्ये महिलांची स्वच्छता, सुरक्षितता, वैयक्तीक काळजी बरोबरच महिलांसाठी सौंदर्य उत्पादने देखील ठेवण्यात आलेली आहेत. **Woloo** या संस्थेचे एक मोबाईल ॲप देखील असून, सदर ॲपवर रजिस्ट्रेशन केल्यावर भारतामध्ये उपलब्ध असलेल्या सुमारे ४० हजार स्वच्छ **Woloo Powder Rooms** ची माहिती व ठिकाण वापरकर्त्यास उपलब्ध होवू शकेल. सदर रुम साकारण्यासाठी महा पालिकेच्या शहर अभियंता अनिता परदेशी, कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे, उपअभियंता योगेश गोटेकर यांनी विशेष प्रयत्न केले.

# वंचित बहुजन आघाडीचा रोजगार मेळावा

## मोकळ्या जागेत सुरू करणार आठवडी बाजार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी)**

सध्याची बेरोजगारी पाहता तरूणांची हाताला काम मिळावे आणि जास्तीत जास्त छोटे उद्योजक निर्माण व्हावे यासाठी वंचित बहुजन आघाडीने पुढाकार घेतला असून डोंबिवली पश्चिमेतील यशवंत नगर गायकवाड मैदान या ठिकाणी वंचित बहुजन आघाडीचे डोंबिवली पश्चिम शहर अध्यक्ष गणेश गायकवाड यांनी आपल्या वडीलोपार्जीत बौध्द वाड्यातील नियोजीत बुध्दविहारांच्या जागेत आठवडी भाजीपाला व इतर व्यवसाय भरवत असून याबाबत त्यांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेला सूचना दिली आहे.

गणेश गायकवाड यांच्या वडीलोपार्जीत बौध्दवाड्यांच्या जागेत अनेक वर्षापासून त्या जागेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा कार्यक्रम राबवत असतो. तसेच हि मोकळीक स्वरूपात जागा असून या जागेत दरवर्षी क्रिकेटचे टूर्नामेंट सामने आयोजीत करण्यात येतात. तसेच छोटे मोठे कार्यक्रम आयोजीत करण्यात येतात. हि जागा बुध्दविहारा करीता असून या जागेत थोड्या दिवसांत बुध्दविहाराचे काम चालू होणार असून, ही जागा सद्या गणेश गायकवाड यांच्या ताबे कब्जात आहे. या जागेवर रविवार च्या दिवशी संध्याकाळी ५ ते १० या वेळात येथील तरूणांना व आजूबाजूच्या गावच्या तरूणांना नोकरी नसल्यामुळे उद्योगधंदे नसल्यामुळे त्यांना व्यवसायांची माहीती होऊन जास्तीत जास्त तरूणांना धंदयाबाबत माहीती देऊन व्यवसाय करण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

येथील तरूण चांगल्या मार्गाने जावे व कोणतीही चुकीची लाईन पकडून नशेच्या आहारी न जाता उद्योगधंदयाच्या माध्यमातून आपल्या घर-परीवाराला सांभाळण्या करीता रोजगार उपलब्ध करून देत आहे. समाज हिताच्या दृष्टीकोणातून हे व्यवसायरूपी कामाचे ज्ञान निर्माण होण्याच्या उद्देशाने चालू केले आहे. तसेच या दिवशी धंदयाव्यवसायीकांकडून आजूबाजूला कोणताही कचरा होणार नाही या करीता महापालीकेची घंटा गाडी उपलब्ध केल्यास कोणताही कचरा येथे राहणार नाही असे गणेश गायकवाड यांनी सांगितले.


# अंमली पदार्थ पथकाकडून गांजा जप्त



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी)**

कल्याण परिमंडल ३ चे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याणमध्ये विशेष अंमली पदार्थ पथकाने नशेखोर आणि नशेचे पदार्थ विकणाऱ्यांवर कारवाईचा जोरदार बडगा उगारला असून कल्याण पश्चिमेतील दुर्गाडी परिसरात गांजा विक्री करणाऱ्या तिघांना ताब्यात घेत त्यांच्याकडून २१८० ग्रॅम वाजनाचा ३२ हजार रु किंमतीचा गांजा जप्त केला आहे.

कल्याण पश्चिमेतील दुर्गाडी सीएनजी पंप जवळ सार्वजनिक रोड येथे भिवंडी येथील जिशान अक्तर शेख वय २३ वर्ष, नितीन हिम्मतभाई ओझा वय ५२ वर्ष, परवीन फिरोज शेख यांनी



रिक्षामध्ये २१८० ग्रॅम वाजनाचा ३२ हजार रु किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ विक्रीकरिता जवळ बाळगलेला मिळून आले. या गुन्ह्यात १ लाख ७ हजार रुपये किमतीची रिक्षा व गांजा हा अमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. याबाबत खडकपाडा पोलीस स्टेशन गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी दिली.

# आटगाव ग्रामपंचायत उपसरपंच पदी नामदेव सोकांडे



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/शहापूर(प्रतिनिधी)** - शहापूर तालुक्यातील प्रतिष्ठित समजली जाणारी आटगाव ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदाची निवडणूक नुकतीच पार पडली. या निवडणुकीत आटगाव ग्रामपंचायतचे सदस्य नामदेव सोकांडे यांना सर्व सदस्यानी पाठिंबा दिल्यामुळे त्यांची बिनविरोध उपसरपंच पदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या विजयासाठी विशेष मेहनत घेणारे विजयाचे शिल्पकार अरुण शेलार, मनोज बागुल, यासह सरपंच लक्ष्मण भोईर, शेखर उबाळे, उद्धव भोईर, अरविंद विशे, रविंद्र घावट, तसेच सर्व ग्रामस्थांचे नवनिर्वाचित उपसरपंच नामदेव सोकांडे यांनी विशेष आभार मानले आहेत. त्यांच्याया निवडीने संपूर्ण शहापूर तालुक्यातून उपसरपंच नामदेव सोकांडे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.


# रुद्र पाटीलची शुटींगमध्ये सुवर्णपदाला गवसणी




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ डोंबिवली(प्रतिनिधी)**

मध्यप्रदेश येथे झालेल्या शालेय राष्ट्रीय रायफल शुटींग स्पर्धेत डोंबिवलीकर रुद्र संदीप पाटील या विद्यार्थ्यांनं उज्वल यश संपादन केले आहे. ओमकार इंटरनॅशनल शाळेचा विद्यार्थी असलेल्या रुद्र पाटील याने १४ वर्षे वयोगटातील १० मीटर पीप साईट एअर रायफल खेळ प्रकारत वैयक्तिक कांस्य पदक मिळवले आहे. शिवाय महाराष्ट्र राज्य संघाचे प्रतिनिधीत्व करत असतांना रुद्रनं सुवर्ण पदक पटकावलं आहे.

रुद्र यांनी यापूर्वीही अनेक स्पर्धा गाजवल्या असून तो सध्या वाशी येथील लक्ष शुटींग अँकडमी येथे रमेश माळी यंच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहे. त्याला मिळालेल्या यशाबद्दल त्याचे ओमकार शाळेच्या दर्शना सामंत, अर्चना परुळेकर, तेजल सावंत यांनी कौतुक केले आहे.



# किरण फाळके यांचं निधन

भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांचे नातू आणि अस्सल डोंबिवलीकर किरण फाळके हे आपल्या डोंबिवली शहराचे भूषण होते.

तब्बल ६० वर्षांपासून त्यांचे डोंबिवलीत वास्तव्य होते, या ६ दशकांतील आपल्या शहरात घडलेली स्थित्यंतरं त्यांनी जवळून अनुभवली होती.

अनेक वर्षे शास्त्रज्ञ म्हणून काम करणारे किरणजी हे अत्यंत स्वच्छंदी आणि हसतमुख स्वभावाचे होते. ॲक्युपंक्चर शास्त्राचा त्यांना चांगला अनुभव होता. गिटार वाजवत गाणी म्हणून लोकांचे मनोरंजन करणे हा त्यांचा छंद होता. यासोबतच अलीकडे डिजिटल ऑडियो रेकॉर्डिंगच्या माध्यमातून त्यांनी दोन ध्वनिमुद्रिका तयार केल्या होत्या. इतकंच नव्हे तर आपल्या **RX** १०० वरून त्यांनी डोंबिवली ते कन्याकुमारी आणि पाकिस्तान सरहद्द पर्यंत भारत भ्रमण केले होते.त्यांच्या निधनाने अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा एक सच्चा डोंबिवली कर आज आपल्यातून हरपला आहे. त्यांच्या आत्म्यास सद्गती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना !

# व्यसनापासून दूर राहण्यासाठी विविध कलागुणांना वाव द्यावा - वैंभव दातार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ ठाणे(प्रतिनिधी)**

व्यसन हे एकदा एकदा लागले आणि आपण त्याच्या आहारी गेलो की आपण त्याशिवाय राहू शकत नाही. त्यामुळे कोणत्याही चांगल्या आणि वाईट प्रतिक्रिया पाहून नकार देण्याची ताकद मुलींनी प्रथमतः केली पाहिजे. कोणतेही व्यसन लागण्यापूर्वी त्याची दक्षता घेतली पाहिजे आणि त्याशिवाय मी राहू शकत नाही इतकं आपण त्याला महत्व दिले नाही पाहिजे. व्यसनापासून दूर राहण्यासाठी आपण आपल्या अंगी असलेल्या विविध कलागुणांना वाव दिला पाहिजे, त्याला वेळ दिला पाहिजे



त्यात गुंतून राहिले पाहिजे. त्यामुळे आपण वाईट विचारांमध्ये किंवा त्या व्यसनाच्या आहारी न जाता आपला बचाव केला जातो. व आपला त्या क्षेत्रात विकास होतो. असे रोटरी क्लब ऑफ ठाणे रॉयल्सचे प्रशिक्षक वैभव दातार यांनी विद्यार्थ्यांना व्यसनाचे प्रकार, व्यसनमुक्तीचे फायदे आणि तोटे यावर मार्गदर्शन करताना सांगितले.

व्यसनमुक्ती जागृतीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये विविध व्यसनांच्या दुष्परिणामांबाबत जनजागृती करण्यासाठी मुख्याध्यापक कुँवर राकेश गंभीर सिंह तोमर यांचे मार्गदर्शनाखाली श्री विभूती प्रकाशानंदजी विद्यालय, इंदिरानगर, वागळे इस्टेट, ठाणे येथे दि.१८ जानेवारी २०२५ रोजी रोटरी क्लब ऑफ ठाणे रॉयल्सच्या अध्यक्षा रोहिणी दास व प्रशिक्षक वैभव दातार यांनी विद्यालयाचे इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी व्यसनमुक्ती मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यालयाचे वरिष्ठ शिक्षक संतोष बी. सिंह, शफातुल्ला खान, संतोषकुमार आर. सिंह, अर्जुन चेमटे, विनोद राठोड, विनोद परदेशी, धनंजय देसले, गणेश कांगणे, सुनील प्रजापती, प्रियंका सिंह सर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बदलापूरमध्ये पुन्हा ६ वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ ठाणे(प्रतिनिधी)

अल्पवयीन मुलीवरच्या अत्याचाराने बदलापूर पुन्हा एकदा हादरलं आहे. बदलापूरमध्ये ६ वर्षांच्या मुलीसोबत गैरकृत्य करण्यात आलं आहे. बदलापूर पश्चिम पोलीस स्टेशनच्या हद्दीत हा धक्कादायक प्रकार घडला आहे. याच परिसरात राहणाऱ्या एका १६ वर्षांच्या मुलाने अल्पवयीन मुलीसोबत गैरकृत्य केलं आहे. ६ वर्षांच्या अल्पवयीन मुलीला खेळायच्या बहाण्याने मुलाने अंधार असलेल्या ठिकाणी नेलं आणि तिच्यासोबत गैरकृत्य केलं. मुलगी शाळेच्या वेळेत शाळेत जायचं नाही, असं घाबरून आईला सांगत होती, मात्र मुलगी असं का करत आहे? असा संशय आईला आला. अखेर आईने विश्वासात घेऊन मुलीला विचारलं, तेव्हा तिने घडलेला प्रकार सांगितला. मुलीने झालेला सगळा प्रकार सांगितल्यानंतर पालकांनी थेट बदलापूर पोलीस स्टेशन गाठलं आणि तक्रार दिली. यानंतर बदलापूर पोलिसांनी संवेदनशील घटनेचं गांभीर्य ओळखून तात्काळ पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला. यानंतर अल्पवयीन आरोपीला ताब्यात घेऊन त्याला भिवंडीच्या बाल न्यायालयात हजर करण्यात आलं. या घटनेनंतर बदलापूरमध्ये खळबळ माजली आहे. बदलापूर पुन्हा हादरलं याआधी बदलापूरच्या शाळेमध्ये अल्पवयीन मुलींवर सफाई कर्मचारी असलेल्या अक्षय शिंदेने अत्याचार केले होते, या घटनेनंतर महाराष्ट्रात संतापाचं वातावरण होतं. या अत्याचाराविरोधात बदलापूरकर रस्त्यावर उतरले आणि त्यांनी दिवसभर रेल रोको आंदोलन केलं.

# बिर्ला महाविद्यालयात क्रीडा महोत्सव




दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी)

बी.के. बिरला महाविद्यालयाच्या वार्षिक क्रीडा महोत्सव उर्जा २.० ने २०२४-२५ सत्रात खेळाडूंच्या ऊर्जेचा, समावेशकतेचा आणि उत्कृष्टतेचा भव्य उत्सव साजरा केला. सहा दिवसांच्या कालावधीत भरवण्यात आलेल्या या महोत्सवात ५,२६८ खेळाडूंनी विविध क्रीडा प्रकारांमध्ये सहभाग नोंदवला. या वर्षीच्या क्रीडा महोत्सवाने ३,८१० पुरुष आणि १,४५८ महिला खेळाडूंच्या सहभागाने समावेशकतेचा आदर्श निर्माण केला.

उत्सवाच्या उद्घाटन समारंभाने स्पर्धेसाठी प्रेरणादायी आणि ऊर्जावान वातावरण निर्माण केले. ऑल इंडिया युनिव्हर्सिटी खेळाडूंनी आणि मागील वर्षीच्या विजेत्यांनी आयोजित केलेल्या प्रतीकात्मक मशाल रिलेने एकता आणि उत्कृष्टतेचे प्रतीक साकारले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. नरेश चंद्र (शैक्षणिक संचालक), डॉ. अविनाश पाटील (प्राचार्य), डॉ. हरीश दुबे (उपप्राचार्य, प्रशासन) आणि डॉ. वाय. डी. बगराव (शारीरिक शिक्षण संचालक) उपस्थित होते. शिव छत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त अभिजीत शिंदे यांच्या प्रेरणादायी भाषणाने खेळाडूंना उत्कृष्टतेसाठी प्रोत्साहित केले.

उर्जा २.० मध्ये बाह्य क्रीडा प्रकार, अंतर्गत क्रीडा प्रकार आणि ई-स्पोर्ट्स अशा विविध प्रकारांच्या स्पर्धा भरवण्यात आल्या, ज्यामुळे प्रत्येक खेळाडूसाठी काहीतरी खास होते. मैदानी क्रीडा प्रकारांमध्ये बॉक्स क्रिकेट मध्ये १,१९६ खेळाडूंच्या सहभागाने सर्वाधिक आकर्षण मिळवले. कबड्डीमध्ये ५१२ खेळाडू सहभागी झाले, त्यात १६२ महिला खेळाडू होत्या. वॉलीबॉल, रस्सीखेच, रग्बी, खो-खो, बास्केटबॉल, फुटबॉल, हँडबॉल आणि हॉकी यांसारख्या खेळांनी देखील स्पर्धेची रंगत वाढवली.

अंतर्गत खेळांमध्ये बॅडमिंटन (सिंगल आणि डबल्स), कॅरम, टेबल टेनिस आणि बुद्धिबळ यांसारख्या क्रीडा प्रकारांनी प्रेक्षकांना खिळवून ठेवले. तसेच १०० मीटर धावपट्टीसारख्या ट्रॅक स्पर्धांमध्ये मुलं आणि मुलींनी उल्लेखनीय कामगिरी केली. तंत्रज्ञानाच्या युगातील लोकप्रिय खेळांना प्रोत्साहन देत उर्जा २.० मध्ये **BGMI**, फ्री फायर आणि इण मोबाइल यांसारख्या ई-स्पोर्ट्स स्पर्धाही आयोजित करण्यात आल्या. एकूण ९०० सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदक विजेत्यांचा गौरव करण्यात आला.

हा महोत्सव विद्यार्थ्यांसाठीच मर्यादित नव्हता, तर शिक्षण व अशैक्षणिक कर्मचारी वर्गानेही उत्साहाने सहभाग घेतला. १५० हून अधिक कर्मचाऱ्यांनी या क्रीडा महोत्सवाला ताणतणाव कमी करणारा व उत्साहवर्धक अनुभव म्हणून वर्णन केले आणि अशा कार्यक्रमांचे भविष्यकाळातही आयोजन व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

# 'बालकांचा सर्वांगीण विकास' प्रकल्प सादर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी)



कल्याण मधील बालक मंदिर संस्थेच्या पूर्व प्राथमिक शाळेत वार्षिक प्रकल्प मांडण्यात आला. प्रकल्पाचे नाव 'शैक्षणिक साधनातून बालकांचा सर्वांगीण विकास' हा विषय घेऊन प्रकल्प मांडला होता. यामध्ये विविध शैक्षणिक साधने मांडली होती. यात मराठी विषयातील चित्र शब्द जोडी, चित्र वाचन,व्याकरण, गोष्टी, अभ्यास,राष्ट्रीय सण यांचा समावेश होता.

तसेच गणित या विषयात दशकाची कल्पना,एक ते वीस वर्गीकरण शब्दसंच,रिंग मोजणी व वर्गीकरण, अंक मोजणी, अंकाचे मासे (खेळ), चित्र अंक मोजणी यांचा समावेश होता. इंग्रजी आणि गणितमध्ये ही **1 to 20 number's Aa to Zz** , सामान्य ज्ञान मांडले होते. हस्तकला चित्रकला या मधे ठसेकाम, चिकट काम यांचा समावेश होता. तसेच मुक्त व्यवसाय, जीवन व्यवहार आणि इंद्रिय शिक्षण या मध्ये मातीकाम, मणी ओवणे, निवडणे, रुमालाच्या घड्या घालणे, पंचंद्रियांचा विकास याचा समावेश होता.

विज्ञान या विषयांमध्ये मुलांना समजतील व करता येतील असे सोपे प्रयोग होते. बी पेरणे, गढूळ पाणी स्वच्छ करणे, पाण्यात विरघळणारे न विरघळणारे पदार्थ यांचा समावेश केला होता. या प्रकल्पाचा मूळ हेतू हाच होता की मुलांना हसत खेळत या साधनांच्या मदतीने अभ्यासाची गोडी लागावी हा होता. प्रकल्पाविषयी थोडक्यात माहिती मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी सांगितली. छोट्या गटातील दोन विद्यार्थिनींनी नऊवारी साडी नेसून पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अलका जडे यांनी केले. प्रमुख पाहुण्या स्नेहल करमरकर माजी शिक्षिका या उपस्थित होत्या. बालक मंदिर संस्थेच्या विशेष कार्यकारी अधिकारी वैदेही बागुल उपस्थित होत्या. शालेय समिती अध्यक्ष तृप्ती माळीचकर यांच्या मार्गदर्शनाने प्रकल्प सुंदर रीतीने पार पडला. पूर्व प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका अनुजा पेठे व कॉऑर्डिनेटर गौरी रानडे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

# ज्ञानोत्सव सारखे उपक्रम होणे गरजेचे-आ. रवींद्र चव्हाण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ डोंबिवली(प्रतिनिधी)

ओमकार शाळेचा ज्ञानोत्सव हा एक स्तुत्य उपक्रम आहे. शालेय जीवनात विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडवणे ही मोठी गोष्ट असते. प्रा. सुरेंद्र वाजपेयी यांनी डोंबिवलीसह ठाणे जिल्ह्यासाठी मोठे योगदान दिले आहे. त्यांना ज्ञानोत्सव सारखा उपक्रम राबवून ख-या अर्थानं आदरांजली वाहण्यात येत आहे, असे प्रतिपादन भाजप कार्यकारी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी ओमकार एज्युकेशन ट्रस्ट आयोजित ज्ञानोत्सव या व्याख्यानमालेच्या समारोप प्रसंगी केले. ज्ञानोत्सव व्याख्यानमालेत विद्यार्थ्यांना विविध विषयातील मान्यवरांनी मार्गदर्शन केले. ज्ञानोत्सवाच्या समारोप प्रसंगी आ. रवींद्र चव्हाण, आ. राजेश मोरे, कल्याण जिल्हा कारागृह तुरुंग अधिकारी अमेय पोतदार उपस्थित होते. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना आ. चव्हाण यांनी वाजपेयी सरांनी केलेल्या कामाची माहिती दिली, आणि त्यांचा आदर्श घेण्याचेही आवाहन केले. ज्ञानोत्सव व्याख्यानमालेच्या पहिल्या दिवशी निवृत्त पोलीस सब इन्पेक्टर विनोद विचारे यांनी सुरक्षा आणि विद्यार्थी या विषयावर मार्गदर्शन केले. लिलावती हॉस्पिटलच्या न्यूरो पीडियाट्रिक फिजिओथेरपिस्ट डॉ. स्नेहल देशपांडे यांनी व्याख्यानमालेच्या दुस-या माळेत मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना शालेय जीवनात शंभर टक्के परिश्रम घेतले तर त्याचे फळ नक्की मिळते, असे सांगितले. यश हे एका गोष्टीवर अवलंबून नसते. त्यासाठी आपल्याला आपला फोकस किती ठाम आहे, हे महत्त्वाचे असल्याचे डॉ. देशपांडे यांनी सांगितले. प्रसिद्ध लेखिका अमी गणात्रा यांना विद्यार्थ्यांना महाभारतातील व्यक्तीमत्वांपासून काय गुण घेता येतील याबाबत मार्गदर्शन केले. अर्जून हा सर्वश्रेष्ठ धनुर्धर कसा झाला, हे सांगताना गणात्रा यांना प्रत्येक विदयार्थ्यांनी कठोर मेहनत करावी, फळाची अपेक्षा ठेऊ नये. यश कधी ना कधी मिळणारच अशा शब्दात विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत केले. प्रसिद्ध ट्रेकर ओंकार ओक यांनी निसर्ग बघतांना कॅमे-यापासून दूर रहात त्याचा आनंद कसा घ्यायचा याबाबत मार्गदर्शन केले. फिरायला गेल्यावर त्या स्थानाचा आनंद घ्यायला हवा. अशावेळी फोटो काढण्यात किंवा व्हिडिओ काढण्यात व्यस्त राहिल्यास हा आनंद घेता येत नाही हे सांगतांना ओक यांनी सह्याद्रीच्या द-याखो-यांची माहिती दिली. ज्ञानोत्सव व्याख्यानमालेत शेवटचे पुष्प गुंफले ते कल्याण जिल्हा कारागृह तुरुंग अधिकारी अमेय पोतदार यांनी. विद्यार्थ्यांनी आपल्या राजघटनेचा अभ्यास का करावा, याबाबत त्यांनी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. भारताची राज्यघटना ही जगातील अन्य कुठल्याही देशांपेक्षा मोठी, लिखित राज्यघटना असल्याचे पोतदार यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना गोष्टी रुपात राज्यघटनेचे महत्व सांगतांना खिळवून ठेवले.

# हॉटेल प्रसादालयाचा वाचनालय उपक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :



धावपळीचे जीवन, मोबाईल व इंटरनेटच्या युगामध्ये कामात व्यस्त असल्यामुळे आपली वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे.राज्याची भाषा असलेल्या मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर व्हावा आणि मराठी भाषेच्या संवर्धन व्हावे या येथूने दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२५ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येत आहे याचे औचित्य साधून गुरुवार दि.१६ जानेवारी २०२५ रोजी हॉटेल प्रसादालय ठाणे येथे प्रतिक्षालयामध्ये थांबलेल्या खवय्यासाठी वाचनालय सुरू केले आहे.

या वाचनालयामध्ये गजानन महाराज विजय ग्रंथ, भगवतगीता, संत वाङमय, मराठी साहित्य तसेच थोर विचारवंताचे चरित्र अशी शंभरहून अधिक पुस्तके ठेवण्यात आली आहेत. त्यामुळे आता हॉटेल प्रसादालया मध्ये भोजनासाठी प्रतीक्षा करणारे ग्राहकांचा वेळ वाया न जाता त्यांना मराठी संस्कृतीचे ज्ञान घेता येणार आहे. मराठी भाषा संवर्धनासाठी सुरू केलेल्या चळवळीस आवश्य भेट देऊन वाचनाचा आनंद घ्यावा असे आवाहन गंजानन आंधळे, शशिकांत दौंड यांनी केले आहे.

# ठाणे मनपा शाळांचा क्रीडामहोत्सव संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :



ठाणे महानगरपालिका शिक्षण विभाग आयोजित मध्यवर्ती क्रीडा महोत्सव २०२४-२५ च्या उदघाटन भारतरत्न सचिन तेंडुलकर स्टेडियम, सावरकर नगर येथे दि १६ जानेवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आले होते. मध्यवर्ती क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन उपआयुक्त (शिक्षण), सचिन सांगळे,माजी नगरसेवक दिलीप बारटक्के आणि राष्ट्रीय पातळीवरील खेळाडू चार्वी नितीन पावशे या मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आहे. शाळा क्र. ६९ च्या विद्यार्थिनींनी सुरेल आवाजात ईशस्तवन व स्वागत गीत सादर केले. मान्यवरांच्या हस्ते क्रीडाध्वजाचे ध्वजारोहण झाले. ध्वजाला मानवंदना म्हणून वर्तकनगर गटातील शाळा क्र. ४४,३०, २२,४६, १२० या शाळांमधील विद्यार्थ्यांनी शिस्तबध्द असे संचलन व कळवा गटातील शाळा क्र.९२ व २७ च्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक लेझीम सादर केले.

ठाणे महानरगपालिकेच्या एकूण १०३ शाळांच्या विद्यार्थ्यांच्या विभागीय क्रीडा स्पर्धा काही दिवसांपूर्वी झाल्या होत्या. एकूण आठ गटांचे विजयी संघाचे कबड्डी, खो-खो चे अंतिम सामने व वैयक्तिक स्पर्धा हया क्रिडांगणावर दिवसभरात पार पडल्या. या क्रीडामहोत्सवात शिक्षकांसाठी खो खो आणि संगीत खुर्ची स्पर्धा घेण्यात आल्या.हे या क्रीडा महोत्सवाचे वेगळेपण होते.

दि.१८ जानेवारी २०२५ रोजी बक्षीस वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी शिक्षणाधिकारी कमलाकांत म्हेत्रे यांनी या दिमाखदार कार्यक्रमाच्या आयोजकांचे कौतुक करून सर्व खेळाडूंना प्रोत्साहन पर शुभेच्छा दिल्या. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेल्या राष्ट्रीय पातळीवरील कबड्डीपटू अथर्व अजय प्रांजाळे यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना हरण्याची भीती न ठेवता पुन्हा जोमाने खेळत राहण्याचा सल्ला दिला. स्थानिक माजी नगरसेवक दशरथ पालांडे हे विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी आवर्जून उपस्थित होते.

सदर प्रसंगी राबोडी शाळा क्र.११, शांतीनगर शाळा क्र. ३८ व ४२ विद्यार्थ्यांनी तालबध्द लेझीम प्रकार सादर करून उपस्थितांची मने जिंकली, तर मानपाडा गटातील शाळा क्र. ५४, ५३, २५ या शाळांमधील विद्यार्थ्यांनी तालबद्ध कवायत सादर केली. शाळा क्र.३ इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या विद्यार्थ्यांनी सुंदर असे पिरॅमिड्स सादर केले तर शाळा क्र.१८ च्या विद्यार्थ्यांनी लोकनृत्य सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

मान्यवरांच्या शुभहस्ते सर्व विजयी संघांना ट्रॉफी आणि बक्षिसे वितरण करण्यात आले. सदर कार्यक्रमास, प्राथ.शिक्षक संघटनेचे अध्यक्ष सुनील फापाळे, बाबाजी फापाळे, ठाणे पालघर शिक्षक पतपेढीचे संचालक जगन्नाथ जाधव, शिक्षक सेनेचे ज्ञानेश्वर परदेशी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे नियोजन गटाधिकारी संगीता बामणे यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती क्रीडा महोत्सव समितीचे कार्याध्यक्ष विश्वास कोल्हे, उपकार्याध्यक्ष आशा पाटे, चिटणीस रविंद्र सकपाळ, सहचिटणीस वर्षा मटकर, शेख आफाक अहमद, राजेंद्र बामणे, सुरेश पाटील व इतर समित्यांचे पदाधिकारी यांनी उत्कृष्टरित्या पार पाडले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश पाटील आणि सविता चौधरी यांनी प्रभावीपणे केले. मध्यवर्ती क्रीडामहोत्सव समितीचे कार्याध्यक्ष यांनी सर्वांचे आभार मानले.




# मुरबाड शहरामध्ये स्वच्छता अभियान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता मुरबाड(प्रतिनिधी)

मुरबाड शहर स्वच्छता अभियान अंतर्गत आज शुक्रवार दि.१७ जाने.२०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक ,मुरबाड पोलीस स्टेशन आणि परीसरातील स्वच्छता स्वच्छता करण्यात आली. या स्वच्छता अभियानात मॉडर्न इंग्लिश मिडीयम स्कूलचे शिक्षक आणि विद्यार्थी यांनी सहभाग घेतला,तसेच नगरपंचायत प्रशासनाचे आरोग्य अधिकारी आणि स्वच्छता कर्मचारीही सहभागी झाले होते. यावेळी सामाजिक कार्यकर्ते

रूपेश गुजरे,मुकेश ठाकरे, रघुनाथ गायकर, विनोद मोरे, प्रकाश गायकर,महेश देशमुख,प्रदिप मिश्रा सर,निलेश गायकर असे अनेक स्वच्छता दुत आवर्जून उपस्थित राहिले होते. जमलेल्या सर्वांनी मिळून यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले आणि आजपासून मुरबाड शहर स्वच्छता अभियानाची अधिकृत घोषणा करण्यात आली.पुढील टप्प्यात शास्त्रीनगर रोडवरील मोक्षधाम आणि एमआयडीसी स्मशानभूमीची स्वच्छता करण्याचे ठरले आहे.याबाबत लवकरच सर्वांना अवगत केले जाईल.तरी आज या स्वच्छता अभियानात सहभागी झालेल्या सर्व सहकारी, विद्यार्थी आणि प्रशासन तसेच कर्मचारी वर्गाचे शहर स्वच्छता कमिटीच्या वतीने मनःपुर्वक धन्यवाद मानले आहेत.

# 'यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली' - सुनील म्हसकर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/बदलापूर(प्रतिनिधी)

गुरुवार, १६ जानेवारी २०२५ रोजी जागृती शिक्षण प्रसारक मंडळ संचलित योगी श्री अरविंद गुरुकुल शाळा, बदलापूर येथे प्रसिध्द व्याख्याते सुनील म्हसकर सर यांचे 'यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली' या विषयावर सुंदर व्याख्यान संपन्न झाले.

यावेळी विद्यालयाच्या माध्यमिक विभागाचे ज्येष्ठ शिक्षक सुनील राऊत, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक योगेश सोरटे, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका रोहिणी कुलकर्णी, माध्यमिक विभागाचे साहाय्यक शिक्षक दिपक विशे आणि इयत्ता ८वी ते १०वीचे अनेक विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सुनील म्हसकर म्हणाले की, ' मनात उत्तमाचा ध्यास घेऊन कठोर मेहनत करून, जिद्द व आत्मविश्वास तसेच स्वयंशिस्त बाळगून, वेळेचा सदुपयोग व उत्तम नियोजन करून तसेच मोबाईल, टिव्ही आदिंपासून दूर राहून निरंतर प्रयत्न करत ध्येयपथावर मार्गक्रमण करणे हीच यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली आहे. उपहास, विरोध आणि स्वीकार या तीन टप्प्यांमधून आपण यशस्वी जीवनाची वाटचाल नेहमी सत्याच्या मार्गानेच केली पाहिजे. आयुष्यात नकारात्मक गोष्टींना तिलांजली देऊन



सकारात्मक दृष्टीकोन बाळगून येणाऱ्या संकटांवर हसतमुखाने मात करायला शिकलो पाहिजे. आपला देह चंदनासारखा झिजवून आपल्या अमोघ कर्तृत्वाने इतरांचे जीवन सुगंधित केले पाहिजे. इतरांना आनंद दिला पाहिजे. दररोज व्यायाम व खेळांच्या माध्यमातून आपले शरीर व मनाचे आरोग्य निरोगी व सुदृढ ठेऊन आपण अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय या पंचकोशांचा विकास केला पाहिजे. सद्विचार, सदाचार, सद्भावना, सदप्रवृत्ती व सुसंगती या पंचसूत्रीचा अवलंब केला पाहिजे. अपयशाने खचून न जाता आपल्यातील दैवी शक्ती जागृत करून आणि आपल्या अंगी तेजस्विता, तपस्विता आणि तत्परता बाळगून आपल्या यशस्वी जीवनाची वाटचाल निरंतर आपले ध्येय साध्य करण्यासाठी सुरू ठेवली पाहिजे. तरच आपणांस यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली सापडू शकेल!'

सुनील म्हसकर सर हे एक प्रज्ञावंत साहित्यिक व सुप्रसिध्द व्याख्याते असून ते 'शारदासुत' या टोपण नावाने साहित्य लेखन करतात. ते राष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय कार्य करणाऱ्या स्वामी विवेकानंद संस्थेचे संस्थापक अध्यक्ष असून सध्या ते भिवंडी तालुक्यातील शेतकरी उन्नती मंडळ काल्हेर संचलित सिताराम रामा पाटील विद्यालय व रामदास दुंदा केणे कनिष्ठ महाविद्यालय आमणे येथे साहाय्यक शिक्षक आहेत. त्यांनी आजतागायत विविध ठिकाणी अनेक विषयांवर शंभरहून अधिक उत्तम उत्तम व्याख्याने देऊन व मार्गदर्शन करून अनेक विद्यार्थी व युवक घडविले आहेत.

कार्यक्रम प्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या सुमधुर आवाजात स्वागतगीत व ईशस्तवन सादर केले. त्यासाठी इयत्ता ८वीच्या कुमार आदित्य पाटील याने हार्मोनियम वादक म्हणून तर तबला वादक म्हणून कुमार नील करडे याने साथ दिली. तर कुमारी अनुष्का येंदे हिने प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमार विराज बारवे याने केले तर कुमार नील करडे याने उपस्थितांचे आभार मानले.

# कल्याणमध्ये सुभाष मैदान बचाव मोहीम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी)

कल्याण पश्चिमेतील कल्याण डोंबिवली महानगरपालिका मुख्यालयाला लागून असलेल्या सुभाष मैदानात इनडोअर गेमसाठी हॉल बांधण्यात येणार असून या हॉलला सर्व खेळाडुंनी विरोध केला असून आहे त्या मैदानात हा हॉल न उभारता मैदानाव्यतिरिक्त इतर जागेत हा हॉल उभारण्याची मागणी करण्यात येत आहे. त्यामुळे हे सुभाष मैदान वाचविण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अहिल्याबाई चौक शाखा अध्यक्ष संदिप पंडित यांच्या वतीने सुभाष मैदान बचाव मोहीम छेडण्यात आली असून जनआंदोलनाचा इशारा दिला आहे.

ऐतिहासिक कल्याण नगरीत सर्वसामान्यांसाठी 'सुभाष मैदान' हे एकमेव मोकळा श्वास घेण्याची जागा उरलेली आहे. या मैदानात क्रिकेट, कबड्डी, फुटबॉल असे नानावीविध खेळ खेळले जातात. सर्वसामान्यजण तेथे मॉर्निंग वॉक, व्यायाम तसेच धकाधकीच्या जीवनातून थोडा विरंगुळा म्हणून येत असतात. मुळात सुभाष मैदान तसे फार मोठे मैदान नाही. आता यात 'इनडोअर गेम' साठी म्हणे 'मल्टीपर्पज हॉल' बांधण्याचा घाट महा पालिका वर्तुळात सुरू असल्याची चर्चा आहे.

नक्षत्र उद्यानाच्या गेट पासून मैदानाच्या ३५ टक्के या दरम्यान हा हॉल होणार आहे. पण यामुळे



मुळातच छोटे क्षेत्रफळ असलेल्या सुभाष मैदानाची जागा आक्रसणार आहे. परिणामी अत्यंत गैरसोय होणार असा जनअक्रोश आहे. या विकास यात्रेला, योजनांना, सुविधांना विरोध नाही. पण हे नियोजन करताना नागरिकांची गैरसोय तसेच नुसते अडथळे होऊ नयेत. 'मल्टीपर्पज हॉल' अन्यत्र व्हावा, ज्यामुळे सुभाष मैदानाची जागा विनाकारण आक्रसली जाऊ नये ही मनसेची भूमिका आहे.

सर्वसामान्य नागरिकांचे मन भूमिका याचा सारासार विचार न करता सुभाष मैदानातच 'मल्टीपर्पज हॉल' हा उपक्रम महापालिका लादणार असेल तर नाईलाजास्तव जन आंदोलन करणे भाग पडेल याची दखल महानगरपालिकेने घ्यावी असा इशारा मनसेचे शाखा अध्यक्ष संदिप पंडित यांनी दिला आहे.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 g Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी